सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७२ | बुधवार, दि. २४ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
**आजचे भाव**

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४६०००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३३७००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११२०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३६०/-
भाव प्रती १० ग्राम

## निवेदन

आजच्या बुधवार, दि. २४ जून २०२६ रोजीच्या अंकात 'मसाला' व 'मंगल' पान देता आलेले नाही. ते गुरुवार, दि. २५ जून २०२६ रोजी नियमितपणे प्रसिद्ध होतील. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी

– संपादक


**आजचे अभीष्टचिंतन**




श्री. नरेंद्र संदानशीव
माजी नगरसेवक, अमळनेर


श्री. सौरभ जैन
अमळनेर


श्री. विशाल चौधरी
फोटोग्राफर


श्री. उन्मेष पाटील
माजी खासदार

# तांबेपुरा बोगद्यात मुख्य जलवाहिनी फुटली; पाण्याची नासाडी

## पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील यांच्या हस्तक्षेपाने युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरात आधीच गंभीर पाणीटंचाईचा सामना करावा लागत असताना तांबेपुराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील विप्रो कंपनीजवळील बोगद्यात शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य वाहिनी फुटल्याने मोठ्या प्रमाणावर पाण्याची नासाडी झाली आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असतानाच पालिकेचे पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील यांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे संबंधित गळती दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार तांबेपुरा व रामवाडी परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य वाहिनीला गळती लागल्याने ती फुटून मोठ्या दाबाने पाणी बाहेर येऊ लागले. रस्त्यालगत मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे चित्र निर्माण झाले. एकीकडे शहरात नागरिकांना आठ ते दहा दिवसांनी पाणी मिळत असताना अशाप्रकारे पिण्याच्या पाण्याची नासाडी होत असल्याचा प्रकार घडल्याने नागरिक तीव्र संताप व्यक्त करीत आहेत.

या घटनेनंतर नागरिकांकडून पालिका प्रशासनाच्या देखभाल व नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. नियमित पाहणी व देखभालीअभावी अशा घटना घडत असल्याचा आरोपही स्थानिकांकडून करण्यात आला आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच पालिका पाणीपुरवठा सभापती पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तातडीने पाणीपुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांना पाचारण करून दुरुस्तीचे निर्देश दिले. दरम्यान, जलवाहिनी दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले असून, संभाव्य मोठी पाण्याची नासाडी रोखण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

ऐन पाणीटंचाईच्या काळात निर्माण झालेली गंभीर परिस्थिती लक्षात घेता अशा घटना टाळण्यासाठी पाणीपुरवठा यंत्रणेची नियमित तपासणी व देखभाल करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे.



*अमळनेर : तांबेपुराकडे जाणाऱ्या रस्त्यावरील विप्रो कंपनीजवळील बोगद्यात शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य वाहिनी मंगळवार, दि. २३जून रोजी फुटल्याने मोठ्या प्रमाणावर पाण्याची नासाडी झाली. तिच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू झाल्यानंतर पाहणी करताना पालिकेचे पाणीपुरवठा सभापती कैलास पाटील.*



*अमळनेर : शहरातील जोशीपुरा परिसरात वेळेत गटारींची साफसफाई करण्यात न आल्याने त्याचा फटका नागरिकांना बसत असून, रविवार, दि. २१ जून रोजी झालेल्या पावसामुळे गटारींतील पाणी थेट रस्त्यावर आणि नागरिकांच्या घरात शिरले. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय निर्माण झाली आहे.*

# वेळेत गटारींची सफाई न झाल्याने जोशीपुरा जलमय

## गटारींतील पाणी थेट घरांमध्ये शिरले; नागरिक त्रस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील जोशीपुरा परिसरात वेळेत गटारींची साफसफाई करण्यात न आल्याने त्याचा फटका नागरिकांना बसत असून, रविवार, दि. २१ जून रोजी झालेल्या पावसामुळे गटारींतील पाणी थेट रस्त्यावर आणि नागरिकांच्या घरात शिरल्याने मोठी गैरसोय निर्माण झाली आहे. परिसरात साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण बनले आहे.

रविवारी झालेल्या पावसानंतर जोशीपुरा भागातील रस्ते पाण्याखाली गेले. गटारी तुंबल्याने सांडपाण्याचा निचरा न झाल्याने अनेक घरांमध्ये घाण पाणी शिरले. यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, त्यांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

याबाबत परिसरातील नागरिकांनी सांगितले, की गटारींची नियमित साफसफाई होत नसल्याने दरवर्षी पावसाळ्याच्या दिवसांत अशीच परिस्थिती निर्माण होते. साचलेल्या पाण्यामुळे दुर्गंधी तसेच साथीच्या आजारांचा धोका वाढण्याची शक्यता असल्याची भीती आहे. पालिकेने याकडे गंभीरतेने लक्ष देऊन तातडीने गटारींची स्वच्छता करून पाण्याचा निचरा सुरळीत करण्याची मागणी या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसची अमळनेर शहर जम्बो कार्यकारिणी जाहीर

## कार्याध्यक्षपदी जितेंद्र झाबक व गोविंदा बाविस्कर यांची नियुक्ती


जितेंद्र झाबक


गोविंदा बाविस्कर


चेतन राजपूत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर शहर राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) ची जम्बो शहर कार्यकारिणी शहराध्यक्ष चेतन राजपूत यांनी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष संजय पवार यांच्या मंजुरीने जाहीर केली आहे.

सदर कार्यकारिणीत शहरातील सर्व प्रभागांतील क्रियाशील कार्यकर्त्यांचा समावेश असून, समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळे शहरात राष्ट्रवादीचे संघटन वाढविण्यासाठी ही कार्यकारिणी पूरक ठरणार आहे. यानंतर विविध सेल व आघाडीचे प्रमुख नियुक्त केले जाणार आहेत. कार्यकारिणीत शहर कार्याध्यक्षपदी खानदेश शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष जितेंद्र शांतीलाल झाबक व गोविंदा जयवंतराव बाविस्कर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांना उपाध्यक्ष, सरचिटणीस, संघटक, चिटणीस आदी पदांवर नियुक्त करण्यात आले आहे.

### कार्यकारिणी अशी

शहराध्यक्ष- चेतन देवसिंग राजपूत, कार्याध्यक्ष- जितेंद्र शांतीलाल झाबक, गोविंदा जयवंतराव बाविस्कर, उपाध्यक्ष-विजय सुपडू पाटील, हाजी रफिक तेली, सयाजीराव (बबलू) कापडणेकर, देविदास नाटू महाजन, चंद्रकांत गणपत चौधरी, शांताराम सुदाम महाजन, सरचिटणीस- देविदास लक्ष्मण देसले, शेख मुशीर शेख गयास, संदीप केवलचंद जैन, शेख जुनैद शेख कादर, प्रवीण संताजीराव देशमुख, कोषाध्यक्ष-प्रमोद रघुनाथ पाटील, सह कोषाध्यक्ष- जितेंद्र रवींद्र मराठे, संघटक- दीपक पंडित सोनवणे, संदीप ताराचंद पाटील, गुणवंत सुरेश वाघ, संघटक- मोहन बन्सीलाल भोई, संघटक- पंकज वासुदेव भोई, सहसंघटक- सुभाष दिलीपराव देशमुख, चिटणीस- जयेश महेशराव पाटील, जितेंद्र अमृत भामरे, जयेश अरविंद पाटील. सदस्य- इब्राहिम खाटीक, पंकज अशोक साळी, रवींद्र पंजवाणी, निलेश उत्तमराव महाजन, राहुल विजय पाटील, शेखर लोटन पाटील, प्रशांत मधुकर बडगुजर, बीतराई राजा, रोशन तोलाणी, सुभाष प्रल्हाद भोई, राजेंद्र रामचंद्र संदानशीव, प्रवीण शेखर पाटील, दीपक शांताराम मोरे, सागर संजय वाघ, बाळू संतोष पाटील, गणेश तापीराम पाटील, संतोष गणेश गुप्ता.

**कायम निमंत्रित सदस्य–** आमदार अनिलदादा भाईदास पाटील, सौ. जयश्रीताई अनिल पाटील, सौ. तिलोत्तमाताई रवींद्र पाटील, अशोक आधार पाटील, अमळनेर, मुक्तार खाटीक, विनोद कदम, सौ. भारतीताई नरेंद्र चौधरी, शेख सालिमोद्दीन ऊर्फ सलीम टोपी, सौ. रिताताई भूपेंद्र बाविस्कर, एल. टी. पाटील, भागवत पाटील, जितेंद्र हरिश्चंद्र ठाकूर, विक्रांत पाटील, विवेक पाटील, राजेश शिवाजीराव पाटील, भाईदास महाजन.



*अमळनेर : येथील युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वक्त्यांच्या कार्यशाळेत सहभागी झालेले सीनिअर व ज्युनिअर वक्ते.*

# वक्ता हा जन्मत नाही, घडविला जातो : प्रा. डॉ. निकम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील युवा कल्याण प्रतिष्ठानतर्फे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त वक्त्यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात १०० युवा वक्ते, जनतेचे सेवक व सत्यशोधक विचारांच्या वक्त्यांनी राजर्षी शाहू महाराज महाराजांविषयी शाळांमध्ये जाऊन भाषणे दिली. याप्रसंगी वक्त्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. राहुल निकम म्हणाले, की 'वक्ता हा जन्मत नाही तर घडविला जातो'. वक्त्यांच्या कार्यशाळेत प्रा. डॉ. लीलाधर पाटील यांनीही मार्गदर्शन केले. युवा कल्याण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. अशोक पवार यांनी प्रास्ताविक केले.

सुनीता मोरे यांनी लिहिलेल्या राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याविषयीचे गीत अनिता संदानशिव, भारती कोळी, माधुरी पाटील, निवेदिता कापडणेकर व डी. ए. पाटील यांनी सादर केले. सोपान भवरे लिखित राजर्षी शाहू महाराजांच्या जीवन कार्याविषयीचे वाचन साहित्य सर्व वक्त्यांना वाटण्यात आले. कार्यशाळेत युवा वक्ते मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. याप्रसंगी मुख्याध्यापिका अनिता बोरसे, रामेश्वर भदाणे, अशोक बिऱ्हाडे, संजय पाटील, चंद्रकांत देसले, प्रा. सुनील वाघमारे, बापूराव ठाकरे, मिलिंद निकम, अशोक केशवराव पाटील, अतुल डोळस, अजय भामरे, सुनील वाघमोडे आदी उपस्थित होते. डी. ए. पाटील यांनी सूत्रसंचालन केले.




**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

## संपादकीय

### 'नीट'ची सुरक्षितता आणि गुणवत्ता

गेल्या महिनाभरापासून प्रचंड चर्चेत असलेली आणि वादग्रस्त ठरलेली राष्ट्रीय प्रवेश परीक्षा म्हणजेच 'नीट' अभूतपूर्व बंदोबस्तामध्ये पार पडली. गेल्या महिन्यातील पेपरफुटीच्या प्रकारानंतर यावेळच्या परीक्षेत अधिक सावधानता बाळगली गेली. त्याची आवश्यकताही होती. मागच्या 'नीट' परीक्षेपेक्षा यावेळचा 'नीट'चा पेपर कठीण असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. ही परीक्षा नीट पार पडावी. हीसुद्धा सरकारची तितकीच मोठी परीक्षा होती. काही हलगर्जीपणाचे प्रकार यावेळेलाही घडून आले. एका विद्यार्थ्याच्या प्रवेशपत्रावर अबुधाबीच्या परीक्षा केंद्राचा पत्ता होता किंवा अगदी दोन मिनिटे उशीर झाला म्हणून विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्याचा घडलेला प्रकार दुर्दैवीच म्हणावा लागेल. गलथानपणा आणि संवेदनहीनता हे त्याचे उत्तर ठरते. ज्या पद्धतीचा बंदोबस्त राबविला गेला त्यावरून याहीवेळी गडबड–गोंधळ होण्याची भीती सरकारला वाटली असावी. देशभरात परीक्षा सुरळीतपणे पार पडल्याने सरकार आणि विशेषतः केंद्रीय शिक्षण खात्याने सुटकेचा निश्वास टाकला असेल. परंतु ही परीक्षा सुरळीत पार पडलेली आहे. ती सुव्यवस्थित पार पडलेली नाही हा फरक लक्षात घ्यावा लागेल. साधारणपणे गेल्या तीस वर्षांपासून सलग पेपरफुटीचे प्रकार घडत आहेत. या परीक्षेचा विद्यार्थ्यांवर पडणारा ताण सहन न करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था परीक्षेत अपयशी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांमधील नैराश्य आणि आत्महत्या या सर्व बाबींचा अतिशय गांभीयनि विचार करण्याची आवश्यकता आहे. परीक्षेची कार्यपद्धती किंवा अंमलबजावणी आणि तिचा मूळ उद्देश याबाबतीत अधिक सुव्यवस्थित नियोजन म्हणजेच व्यवस्थापन झाले पाहिजे. केवळ परीक्षा सुरळीत पार पाडून या उर्वरित मुद्दांकडे दुर्लक्ष करता येणार नाही किंवा सरकारला आपली जबाबदारीही झटकता येणार नाही. लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य या एका परीक्षेभोवती गुंतलेले असते आणि केवळ एक परीक्षा विद्यार्थ्यांच्या मानसिक ताणतणावाला कारणीभूत ठरणार असेल तर एकूणच कार्यपद्धतीचा पुनर्विचार करणे हाच एकमेव पर्याय शिल्लक राहतो.

परीक्षेची आवश्यकता, त्यातून साधला जाणारा नेमका उद्देश, त्यासाठी राबविली जाणारी कार्यपद्धती या तीन गोष्टींचा विचार केला तर प्रामुख्याने देशभरातील लाखो विद्यार्थी बारावीच्या परीक्षेपेक्षाही 'नीट'च्या परीक्षेसाठी अधिक मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या गुंतून पडतात. कारण बारावीत मिळालेल्या गुणांना फारसे महत्त्व शिल्लक राहत नाही. 'नीट' परीक्षेतील गुणवत्ता ही अधिक महत्त्वाची ठरत गेल्याने विद्यार्थ्यांना बारावीच्या अभ्यासाबरोबर 'नीट' परीक्षांचाही अभ्यास करावा लागतो. या दुहेरी ताणाची आवश्यकता आहे का की केवळ आपल्याला अपेक्षित असलेल्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळावा आणि त्यासाठी पुन्हा गुणवत्ता सिद्ध करण्याची झटापट विद्यार्थ्यांना करावी लागते. एकाअर्थी बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेची ही दुहेरी शिक्षा सहन करावी लागते. वीस वर्षांपूर्वी या प्रवेश परीक्षांचे झेंगट नव्हते. बारावीच्या गुणांवरच वेगवेगळ्या ठिकाणी प्रवेश मिळत असे. परंतु विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या अभ्यासक्रमासाठी अधिकाधिक पर्याय निवडता यावेत. देशभरामध्ये कुठेही प्रवेश घेता येऊ शकतो. एवढाच एकमेव फायदा विद्यार्थ्यांना करावा लागतो. परंतु या एका कारणासाठी त्यांची होणारी मानसिक ससेहोलपट ही अधिकाधिक चिंतेची बाब होत चालली आहे. हा ताण कमी करून 'नीट' परीक्षेत अधिक सहजता आणि सुलभता कशी आणता येईल याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. आज विद्यार्थ्यांच्या भवितव्यापेक्षाही परीक्षेची सुरक्षितता त्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही अधिक महत्त्वपूर्ण ठरते. मात्र, या सगळ्या गोष्टींची अंमलबजावणी करताना सरकारच्या कार्यपद्धतीची इयत्ता घसरलेली पाहायला मिळते. कोणत्याही परिस्थितीमध्ये विद्यार्थी वेठीला धरला जाणार नाही. तो मानसिक दडपणाखाली येणार नाही. परंतु त्याचा अभ्यास सत्कारणी लागेल. अशा पद्धतीची सहजता आणि व्यापकता 'नीट' परीक्षेमध्ये येण्याची आवश्यकता आहे. देशभरातील हजारो परीक्षा केंद्रांवर तैनात केला गेलेला पोलिसांचा फौजफाटा, प्रश्नपत्रिका पोहोचविण्यासाठी थेट वायुदलाची विमाने वापरण्यापर्यंत गेलेली मजल यावरून 'नीट' परीक्षा म्हणजे युद्धजन्य परिस्थितीचाच नमुना ठरली होती. या सगळ्या वातावरणाचेदेखील विद्यार्थ्यांच्या मनावर दडपण येते हे विसरून चालणार नाही.

भारताला २०४७ पर्यंत विकसित व्हायचे आहे. भारत सध्या जगातील चौथी आर्थिक सत्ता आहे. या गोष्टी जशा वारंवार कौतुकाने सांगितल्या जातात. परंतु याची विपरीत परिस्थिती शिक्षण क्षेत्रामध्ये पाहायला मिळत आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीची चार वर्षांपूर्वी घोषणा झाली. परंतु हे नवे शैक्षणिक धोरण अजूनही पूर्णपणे लागू झालेले नाही. देशाला विकसित होण्यापूर्वी ही शैक्षणिक व्यवस्था विकसित करावी लागेल. केवळ जागतिक विद्यापीठांशी स्पर्धा करण्याच्या उद्देशाने हजारो कोटी रुपये खर्चून परदेशी विद्यापीठांना जागा दिल्या जात आहेत. परंतु शिक्षणातील ही देशी कार्यपद्धती सुधारण्याची चिन्हे दिसत नाहीत. भारतीय युवकांकडे कष्ट, जिद्द, बुद्धिमत्ता या सगळ्या गोष्टी आहेत. परंतु त्यांना योग्य ती संधी मिळत नाही किंवा या बुद्धिमत्तेच्या उपयोगासाठी योग्य पद्धतीची व्यवस्थाही नाही. शिक्षण क्षेत्रच अशा पद्धतीने असुरक्षित असेल तर देशाच्या भावी पिढीचे भवितव्य किती असुरक्षित आहे याची आपण कल्पना करू शकतो. आज आयआयटी आयआयएमची संख्या वाढविली जाते आहे. परंतु तेथे आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयी–सुविधांची प्रचंड कमतरता पाहायला मिळते. वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयांची दुरवस्था आणि त्यांची तेथे चालणारी दुकानदारी ही तर आणखीनच चिंताजनक विषय ठरतो. शिक्षण क्षेत्राला लागलेले हे असुरक्षिततेचे ग्रहण अतिशय प्राधान्यक्रमाने दूर केले गेले पाहिजे. एक परीक्षा यशस्वी करण्याकरिता खर्च होणारी शक्ती, वेळ, पैसा आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम या सर्वांचा सारांश व्यवस्थेत खूप उणिवा असल्याचेच सिद्ध करतात.

## विद्यार्थी केंद्रित शिक्षण, गुणवत्ता विकास हीच डी. आर. कन्या शाळेची ओळख

**द्रौपदीबाई रामचंद्रशेठ कन्याशाळा**
**नामे, उजळली ही माळ ॥**
**ज्ञान संस्काराची देतसे सतत सुवर्ण ज्योत**
**जाळ ॥**
**कर्तृत्वाच्या पंखानी भरारी घेती कन्याभगिनी ॥**
**कीर्ती तिची दरवळे आज गावोगावी पावनी II**

ज्ञान संस्कार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा सुंदर संगम म्हणाजे श्रीमती द्रौपदीबाई रामचंद्रशेठ कन्याशाळा समाजातील कन्या शिक्षणाची गरज ओळखून स्थापन झालेली ही संस्था आज अनेक वर्षाची उज्वल परंपरा जपत प्रगती पथावर वाटचाल करीत आहे. शाळा स्थापन झाली तेव्हापासून शाळेने विदयार्थीनींच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले. शैक्षणिक णवत्ता, सांस्कृतिक जपणूक आणि नैतिक मुल्यांचे संवर्धन हे ध्येय जोपासले आहे. ही आमची शाळा के वळ एक शिक्षण देणारी संस्था नसून आत्मविश्वास, कर्तृत्वान आणि सुसंस्कृत नागरीक घडविणारी एक प्रेरणा स्थान आहे. खान्देश शिक्षण मंडळ संचलित द्रौ. रा. कन्याशाळेच्या प्रगतीमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापिका आदरणीय सौ. एस. एस. सुर्यवंशी मॅडम यांच्या कार्यकाळात शाळेच्या प्रगतीचा आलेख उंचावतच आहे. त्यांच्या कार्यकाळातील काही उल्लेखनीय कार्यांचा थोडक्यात आढावा, खालील प्रमाणे,

✻ विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी शालेय परीसरात व प्रत्येक वर्गात CCTV कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

✻ विद्यार्थिनींना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी, तसेच माहीती तंत्रज्ञान अवगत होण्यासाठी संगणकांच्या संख्येत वाढ करण्यात आली. ✻ शाळेतील विविध सहशालेय कार्यक्रमांसाठी ध्वनिवर्धक व ध्वनिक्षेपक बसविण्यात आले, तसेच आधुनिक अध्यापनशैलीचा वापर करण्यासाठी व शालेय आभ्यासक्रम दृकश्राव्य माध्यमातुन शिकविण्यासाठी ४४ इंच दुरदर्शन संच बसविण्यात आला.

✻ विद्यार्थिनींनीसाठी ग्रंथालयामध्ये E-lybrary चा वापर करण्यात आला.

✻ विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी शाळा परीसराच्या बाहेर दामिनी पथकाची नियुक्ती करण्यात आली. ✻ विद्यार्थिनींच्या सर्वांगिण विकासासाठी विविध स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. त्यात M. M. M. S, M. T. S., स्कॉलरशिप, टि. म. वि. पुणे यांच्यामार्फत इंग्रजी, मराठी, गणित या विषयांच्या परीक्षा घेतल्या जातात. तसेच ऑलंपियाड अंतर्गत विविध विषयांच्या परीक्षा घेतल्या जातात.

✻ सहशालेय विविध उपक्रमांमध्ये वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, भगवत गीता पाठांतर स्पर्धा इ. स्पर्धा घेतल्या जातात.

✻ विद्यार्थिनींच्या कलागुणांना वाव देण्यासाठी गुढी बनविणे, शाडू मातीपासून गणपती कार्यशाळा, राखी तयार करणे यांसारखे उपक्रम राबविण्यात येतात.

✻ राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात आमच्या काही विद्यार्थिनी सहभागी झाल्या.

✻ श्रीमती द्रौ. रा. कन्याशाळेने ८०वर्ष पूर्ण करून ८१ व्या वर्षात पदार्पण केले, त्या निमित्ताने २३ जुलै २०२५ सहस्त्रचंद्र दर्शन सोहळा मोठ्या दिमाखात व उत्साही वातावरणात पार पडला. शाळेच्या वाढदिवसाच्या निमित्ताने २३ जुलै २०२५ रोजी १९८३ साली असलेल्या बॅचने विद्यार्थिनींनी ४४ इंच दुरदर्शन संच दिला. हया माजी विद्यार्थिनींच्या बॅचमध्ये सौ. एस. एस. सूर्यवंशी यांचादेखील समावेश होता. ✻ 'माझी शाळा सुंदर शाळा' या उपक्रमा अंतर्गत शाळेची पूर्ण तपासणी करण्यात आली, त्यात शाळेला अ श्रेणी प्राप्त झाली. तसेच 'Sqqaf' मुल्यांकन याव्दारे दुसऱ्या टप्प्यात जिल्हा स्तरावरून आलेल्या समितीने शाळेला 'अ श्रेणी प्रदान केली. ✻शाळेमध्ये शासकीय चित्रकला परीक्षेअंतर्गत इलेमेंट्री व इंटरमिजेट यासाठी विद्यार्थिनी प्रविष्ट होतात.

**या मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली झाली शाळेची भरभराट**



**श्री. जितेंद्र जैन**
**चेअरमन : स्कूल कमिटी**

### आरोग्य तपासणी

> दरवर्षी विद्यार्थिनींची आरोग्य तपासणी केली जाते. यामध्ये लायन्स क्लब तर्फे विद्यार्थिनींची डोळ्यांची तपासणी करण्यात आली, त्यात त्यांच्याकडून विद्यार्थिनींना चष्मे देण्यात आले.

A गर्भमुक्त कॅन्सर प्रतिबंधक लस लायन्स क्लबतर्फे सलग दोन वर्ष हजार विद्यार्थिनींना ही लस देण्यात आली.

### क्रीडा

> कु. सुकेशनी समाधान सपकाळे अंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत सुवर्णपदक

> कु. नूतन किशोर भोई: अखिल भारतीय राष्ट्रीय रोलर स्केटींग, हॉकी स्पर्धेत सहभाग व विशाखापटटणाम येथील रायफल शूटिंग स्पर्धेत सहभाग

> कु. सृष्टी रघुवीर बडगुजर शालेय मास रेसलिंग राज्यस्तरीय स्पर्धेत प्राविण्य प्राप्त

> कु. लक्ष्मी बंजारा व कु. सुकेशनी सपकाळेः राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत सहभाग

> कु. वैष्णवी शरद पाटीलः राज्यस्तरीय आट्या-पाटया स्पर्धेत सहभाग

### गाईड

– १९ व्या. राष्ट्रीय जांभोरीसाठी लखनऊ उत्तर प्रदेश गाईड कॅप्टन श्रीमती योगेश्री मधुकर पाटील यांच्या समवेत आठ विद्यार्थिनींचा सहभाग.

– गाईड राज्यपुरस्कारासाठी एकूण १४ विद्यार्थिनींची निवड

– शाळेत वेळोवेळी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले जातात. स्वतःच्या सुरक्षिततेबाबत जागृतता निर्माण करणे, संकट प्रसंगी योग्य प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करणे या उद्देशाने शाळेत स्वसंरक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

### विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे



१९७७ ते १९८३ या वर्षी द्रौ. रा. कन्या शाळेतच सौ. एस. एस. सूर्यवंशी मॅडम यांनी माध्यमिक शिक्षण घेतले, त्यानंतर १९८३ ते १९८८ उच्च शिक्षणसुद्धा प्रताप महाविद्यालयातच झाले त्यांचा संपूर्ण शिक्षणाचा प्रवास हा अमळनेर शहरातील खा. शि. मंडळातील नामांकित अशा संस्थेत पूर्ण झाले. योगायोगाने ज्या शाळेत शिक्षण घेतले, त्याच शाळेत उपशिक्षिका म्हणून त्यांची नेमणूक झाली. आणि आज त्याच शाळेत मुख्याध्यापिका हे पद मिळवून विद्यार्थिनींच्या शैक्षणिक प्रगतीबरोबर त्यांच्यात सामाजिक, नैतिक व राष्ट्रीय मूल्य रुजविण्याची कार्य केले. पालक, शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थिनी यांच्या सहकार्याने शाळेच्या विकासासाठी सकारात्मक वातावरण निर्माण करण्यात यश आले. यापुढेही विद्यार्थी केंद्रित शिक्षण, गुणवत्ता विकास आणि शाळेची सर्वांगीण प्रगतीसाठी कटिबध्द राहून कार्य करण्याचा माझा प्रयत्न राहील. माझ्या या सर्व यशामागे खा. शि. मंडळातील सर्व पदाधिकारी, शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू-भगिनी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**सौ. एस. एस. सूर्यवंशी,** मुख्याध्यापिका
श्रीमती द्रौ. रा. कन्या शाळा, अमळनेर

## अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविणारे
# मुंदडा ग्लोबल व्ह्यू स्कूल



मुंदडा फाउंडेशन संचलित, श्री एन.टी. मुंदडा ग्लोबल व्ह्यू स्कूलने शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात आपल्या प्रगतीचा आलेख सातत्याने उंचावत ठेवला आहे. २००४ मध्ये संस्थापक अध्यक्ष मा.श्री. नारायणदादाजी मुंदडा, मा.श्री. श्यामदादाजी मुंदडा आणि श्री. गोविंददादाजी मुंदडा यांच्या आशीर्वादाने संस्थेचे अध्यक्ष श्री. ओमप्रकाश मुंदडा यांनी लावलेले हे रोपटं आज एक विशाल वटवृक्ष बनले आहे. आज शाळेत २००० विद्यार्थी दर्जेदार शिक्षण घेत असून १२० अनुभवी कर्मचारी कार्यरत आहेत. ही शाळा C.B.S.E. मान्यताप्राप्त आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच ध्येय
"Aiming Overall Development of the Child" (मुलांचा सर्वांगीण विकास) हेच ग्लोबल स्कूलचे ब्रीद वाक्य आहे. हे ब्रीद वाक्य प्रत्यक्षात आणण्यासाठी शाळेत वर्षभर विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. यामध्येः
ग्रुप डिस्कशन (Group Discussion)
गायन व नृत्य स्पर्धा
क्राफ्ट आणि ड्रॉईंग (सुप्त कलागुणांना वाव)
ॲप्टीट्युड टेस्ट (बौद्धिक विकास)
या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमधील कम्युनिकेशन स्किल्स, स्टेज डेअरिंग आणि बौद्धिक क्षमतेचा विकास होतो. तसेच, दरवर्षी आयोजित होणाऱ्या वार्षिक स्नेहसंमेलनात शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला आपले कलागुण सादर करण्याची संधी दिली जाते. भारतीय संस्कृतीची ओळख व्हावी म्हणून शाळेत सर्व सण-उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात.

होमी भाभा फाउंडेशन, मुंबई द्वारे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात अमळनेरच्या श्री एन. टी. मुंडदा ग्लोबल व्ह्यू स्कूलने उत्कृष्ट व्यवस्थापनासाठी मानाचा 'बेस्ट स्कूल अवॉर्ड' पटकावला आहे. शाळेचे प्राचार्य श्री. एल. लक्ष्मण यांच्या खंबीर नेतृत्वाखाली शाळेला हा राज्य पातळीवरील बहुमान मिळाला.

तसेच IFEEL UNIVERSITY, LONAVALAYA यांचे तर्फे शाळेचे प्राचार्य श्री लक्ष्मण सर यांना "HONORED FOR EXCELLENCE IN EDUCATION" अवार्ड देऊन गौरविण्यात आले.

**या मान्यवरांच्या मार्गदर्शनाने झाली शाळेची भरभराट**



**श्री. ओमप्रकाश मुंदडा**
**संस्थापक**

१० वीच्या निकालात यशाचा झेंडा; कल्याणी चौधरी तालुक्यात दुसरी!
शाळेने सलग १३ वर्षांपासून इयत्ता १० वीचा १००% निकालाची परंपरा राखली आहे. सातत्याने दरवर्षी या शाळेचे विद्यार्थी ९८% पेक्षा जास्त गुण मिळवून तालुका स्तरावर प्रथम व द्वितीय क्रमांक पटकावत आहेत.
या वर्षाचे दैदिप्यमान यशः
कु. कल्याणी युवराज चौधरी हिने ९८.४०% गुण मिळवून संपूर्ण अमळनेर तालुक्यात द्वितीय क्रमांक पटकावला.
१२ विद्यार्थ्यांनी ९५% पेक्षा जास्त गुण मिळवले.
३६ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून यशाची परंपरा कायम राखली.
२ विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले.

स्पर्धा परीक्षा व क्रीडा क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर झेप
आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थी सक्षम व्हावे म्हणून शाळा एल.के.जी. ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध शासकीय व खाजगी स्पर्धा परीक्षांचे आयोजन करते. यात प्रामुख्यानेः
स्कॉलरशिप (Scholarship)
आणि M.T.S. / N.T.S.
होमी भाभा सायन्स ऑलिम्पियाड व एज्युहील ऑलिम्पियाड
शासकीय ड्रॉईंग , सर्वोदय आणि हिंदी प्रज्ञाशोध परीक्षा
या परीक्षांच्या माध्यमातून दरवर्षी शाळेतील ५ ते ६ विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर चमकतात. शाळेचे अनेक माजी विद्यार्थी आज IIT आणि MBBS सारख्या उच्च शिक्षण क्षेत्रात यशस्वी झाले आहेत. केवळ शैक्षणिकच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही शाळेचे खेळाडू दरवर्षी राज्य पातळीवर (State Level) चमकदार कामगिरी करत आहेत.

"केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व सांस्कृतिक विकास घडवून, त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व घडविण्याचे खरे श्रेय शाळेच्या चेअरपर्सन सौ. छायाभाभी मुंदडा व ॲडमिनिस्ट्रेटर सौ. दीपिका अमेय मुंदडा यांच्या अविरत प्रयत्नांना आणि संस्कारक्षम मार्गदर्शनाला जाते."

✻गुणवत्ता निरंतर टिकवून ठेवण्याची ग्वाही
शाळेच्या या देदीप्यमान यशाचे श्रेय शाळेचे प्राचार्य श्री. लक्ष्मण सर, प्रायमरी प्राचार्या सौ. विद्या लक्ष्मण, ॲडमिनिस्ट्रेटर सौ. दीपिका अमेय मुंदडा, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष योगदान आणि पालकांचे सहकार्य यांना जाते, असे संस्थेचे अध्यक्ष श्री. ओमप्रकाशजी मुंदडा, चेअरपर्सन सौ. छायाभाभी मुंदडा, सचिव श्री. अमेय मुंदडा व सहसचिव श्री. योगेशजी मुंदडा यांनी सांगितले. तसेच, भविष्यातही शिक्षणाची ही उच्च गुणवत्ता निरंतर टिकवून ठेवण्याची ग्वाही त्यांनी याप्रसंगी दिली.




खान्देश शिक्षण मंडळ संचलित
८१ वर्षाचा देदिप्यमान इतिहास असलेले...
**प्रताप महाविद्यालय, अमळनेर, जि.जळगाव**
आजच आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करा.

महाविद्यालयाची वैशिष्ट्ये
Udise No.27030115208

- कला, विज्ञान, वाणिज्य शाखा
- प्रशस्त इमारत व क्रीडांगण
- उत्साही व सुरक्षित वातावरण
- सुसज्ज प्रयोगशाळा
- शैक्षणिक सहलीचे आयोजन
- विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव
- विविध शिष्यवृत्ती परीक्षा
- समाज प्रबोधनात्मक व्याख्यानमाला
- डिजिटल क्लासरूम
- अनुभवी व तज्ञ अध्यापक वर्ग
- नावीन्यपूर्ण शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम
- सुसज्ज ग्रंथालय
- स्पर्धा परीक्षेची तयारी
- मोफत बस पासेस सुविधा
- मोफत आरोग्य तपासणी
- ऑनलाईन संकेतस्थळावर नोंदणी विनामूल्य

प्रवेश सुरु 2026-27
इ. 11 वी
इ. 12 वी

इयत्ता 11 वी या वर्गाची केंद्रीय रजिस्ट्रेशन (नोंदणी) प्रक्रिया विना शुल्क महाविद्यालयात करुन मिळेल.




NCC व NSS असलेले अमळनेर तालुक्यातील एकमेव कॉलेज
संशोधनाची संधी



BCA/BBA/MCA
M.A., M.Sc, M.Com,
Ph.D Research Centre.
Admissions will be conducted through CAP Round based on MAH-BCA/BBA CET-2026

ADMISSIONS 2026-27
Empowering Students, Enriching Futures!

| | |
|---|---|
| F.Y.B.A. | English, Marathi, Hindi, History, Economics, Political Science, Geography, Defence Studies, Philosophy, Psychology. |
| F.Y.B.Com | Financial and Cost Accounting, Computing Skills F.Y.B.Com. and Micro Economic Analysis, Commodity Market, Banking, Office Skills Development. |
| F.Y.B.Sc. | Mathematics, Physics, Chemistry, Electronics, Statistics, Computer Science, Botany, Zoology, Microbiology. |
| F.Y.B.Voc. | Food Processing and Technology, Accounting and Taxation, |

प्रा.डॉ.हर्षवर्धन जाधव, प्राचार्य, प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर
प्रा.पराग पाटील, सेक्रेटरी, खा.शि.मंडळ, अमळनेर
श्री.सी.ए.नीरज अग्रवाल, कार्याध्यक्ष, खा.शि.मंडळ, अमळनेर


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# करिअर Education Way



“ ज्ञान हेच सामर्थ्य आहे. माहिती मुक्ती देणारी आहे. प्रत्येक समाजात, प्रत्येक कुटुंबात शिक्षण हा प्रगतीचा पाया आहे.



## जी. एस. हायस्कूलची गगनभरारी


**अमळनेर नगरी 'शिक्षणाची पंढरी' म्हणून ओळखली जाते. सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शहराला शिक्षणाच्या दृष्टीने अग्रेसर करण्यात सर्वांत महत्त्वाची भूमिका बजावली ती खानदेश शिक्षण मंडळाने. याच संस्थेच्या जी. एस. हायस्कूलने आपल्या शैक्षणिक कार्याच्या यशाची गगनभरारी घेत राज्यात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.**

१८ जुलै १९४२ ला स्थापन झालेल्या जी. एस. हायस्कूलच्या यशाची पताका आजही डौलाने फडकत आहे. खानदेश शिक्षण मंडळाच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांची प्रबळ इच्छाशक्ती, आजी-माजी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षकांचे कष्ट, शाळेसाठी काही तरी नावीन्यपूर्ण करण्याचा ध्यास असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यामुळेच जी. एस. हायस्कूलने गगनभरी घेतली आहे. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता जोपासणारे म्हणून जी. एस. हायस्कूल ओळखले जाते. विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवून अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा प्रयत्नशील असते. शाळेचा परिसर विविध झाडे, वेली व फुलांनी बहरला आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने शाळेची 'ग्रीन स्कूल', म्हणून आगळीवेगळी ओळख निर्माण झाली आहे. शाळेत नियमित सहशालेय उपक्रम राबविले जातात. त्यात वक्तृत्व, कला, क्रीडा आदी उपक्रम व स्पर्धांचा समावेश असतो. यातून विद्यार्थ्यांना सृजनशीलदृष्टी लाभते व नवनिर्मितीचा आनंदही मिळतो. यासोबतच शालेय अध्यापनात अधिक रंजकता यावी व विद्यार्थ्यांना आनंदाने अध्ययन करता यावे, यासाठी प्रशस्त ई-लर्निंग क्लास रूमचा वापर करण्यात येतो. अवघड संकल्पना अधिक सुस्पष्ट व्हाव्यात, यासाठी प्रात्यक्षिकांवर भर दिला जातो. विज्ञानवादी दृष्टिकोनातून सुसज्ज प्रयोगशाळेच्या जोडीलाच खगोलशास्त्राच्या अभ्यासासाठी नाशिक विभागातील इतर शाळांसाठी उत्कृष्ट ठरणारे अवकाश निरीक्षण केंद्र शाळेत उभारण्यात आले आहे. त्याद्वारे ग्रह, धूमकेतू, विविध खगोलीय ग्रहणे सहज अनुभवता, तसेच पाहता येणार आहेत.

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत शाळेचा संपूर्ण परिसर सीसीटीव्ही यंत्रणेच्या निगराणीत सुरक्षित केला आहे. भविष्यातील क्रीडा क्षेत्रातील संधी पाहता शाळेत विविध प्रकारच्या मैदानी व इतर खेळांवर भर दिला जात असून, शाळेचे अनेक विद्यार्थी तालुका ते राष्ट्रीय स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व करत आहेत. 'एनसीसी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांची राष्ट्राप्रति असणारा आदरभाव, तसेच देशभक्ती. त्यातून निर्माण होणारे साहस व शिस्त याची अचूक मांडणी करत त्यांच्या संरक्षण क्षेत्राशी निगडित असलेल्या उज्ज्वल यशाला चालना देण्यासाठी मेहनत करून घेतली जाते.

सांस्कृतिक विद्यार्थ्यांच्या कलगुणांना वाव मिळावा, यासाठी उत्कृष्ट व दर्जेदार स्नेहसंमेलन घेतले जाते. त्यासोबतच राज्य व देशाचा ऐतिहासिक वारसा माहिती व्हावा, यासाठी महाराष्ट्रदर्शन व इतर राज्यांमध्ये शैक्षणिक सहली काढण्यावर शालेय व्यवस्थापनाचा भर असतो. संस्था व शाळेच्या प्रगतीसाठी चेअरमन हरि भिका वाणी, संस्थेचे कार्याध्यक्ष नीरज अग्रवाल, कार्योपाध्यक्ष जितेंद्र जैन तसेच शाळेचे अध्यक्ष योगेश मुंदडे, संचालक डॉ. संदेश गुजराथी, प्रदीप अग्रवाल, संस्थेचे अध्यक्ष विनोद अग्रवाल, उपाध्यक्षा सौ. माधुरीताई पाटील, विश्वस्त सौ. वसुंधराताई लांडगे, मुख्याध्यापक विनोद कदम यांचेही वेळोवेळी सहकार्य लाभते.

### या मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली झाली शाळेची भरभराट



**श्री. हरि भिका वाणी**
**चेअरमन : स्कूल कमिटी**

। तेजस्विनावधी तमस्तु ।



**श्री. विनोद कदम सर**
**(मुख्याध्यापक)**

## संस्कारांची रुजवण करणारे एन. टी. मुंदडा ग्लोबल स्कूल




शाळा सुटली तरी नातं सुटत नाही" हे वाक्य श्री.एन.टी. मुंदडा ग्लोबल स्कूलच्या माजी विद्यार्थ्यांनी खरं करून दाखवलं आहे. सी.बी.एस.ई. मान्यताप्राप्त या शाळेतून बाहेर पडलेले विद्यार्थी आज IIT, MBBS, CA, UPSC आणि कॉर्पोरेट जगतात उच्च पदांवर चमकत आहेत. आणि या यशाचं श्रेय ते विनम्रपणे आपल्या शाळेतील शिक्षण पद्धतीला आणि शिक्षकांना देतात.

**उपक्रमांतून घडले व्यक्तिमत्त्व**

शाळेचे माजी विद्यार्थी सांगतात, "मुंदडा स्कूल मध्ये आम्हाला फक्त पुस्तकी ज्ञान मिळालं नाही." रोजचे ग्रुप डिस्कशन, स्टेज डेअरिंगचे उपक्रम, गायन-नृत्य स्पर्धा आणि ॲप्टीट्युड टेस्ट यामुळे आमचा आत्मविश्वास वाढला. आज मोठमोठ्या कंपन्यांच्या इंटरव्ह्यूला सामोरे जाताना किंवा हजारोंसमोर प्रेझेंटेशन देताना शाळेतल्या स्टेजची आठवण होते. संस्कृतच्या तासाला मिळालेली शिस्त आणि सर्व सण एकत्र साजरे करण्याची परंपरा यामुळे आमच्यातील 'टीम स्पिरीट' आजही कायम आहे.

**शिक्षक म्हणजे आयुष्यभराचे गुरू**

" लक्ष्मण एल. सर फक्त शिकवत नव्हते तर ते आयुष्याची समीकरणं सोडवायलाही शिकवायचे," असे एका माजी विद्यार्थ्याने, जो आज पुण्यात सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे, भावूक होऊन सांगितले. अनेक डॉक्टर, इंजिनिअर झालेले विद्यार्थी आजही अडचण आल्यास आपल्या शिक्षकांना फोन करून सल्ला घेतात. "विद्या लक्ष्मण मॅडमनी प्रायमरीमध्ये घातलेला पाया आज आम्हाला एव्हरेस्ट सर करायला उपयोगी पडतोय," असे एका MBBS करणाऱ्या विद्यार्थिनीने सांगितले.

**संस्थेची भावना**

संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाशभाऊ मुंदडा म्हणतात, "आमच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात मिळवलेलं यश हाच आमच्यासाठी खरा 'बेस्ट स्कूल अवॉर्ड' आहे. मुंदडा परिवार फक्त १०वी पर्यंत नाही, तर आयुष्यभर आपल्या मुलांच्या पाठीशी उभा असतो. हीच आमच्या गुणवत्तेची परंपरा आहे."

### या मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली झाली शाळेची भरभराट



**सौ. छाया मुंदडा** — चेअरमन
**सौ. दीपिका मुंदडा** — प्रशासन अधिकारी

चला...!! आपल्या पाल्याच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी
आजच...प्रवेश निश्चित करुया...!!!
...खा. शि. मंडळाची...
श्रीमती द्रौपदीबाई रामचंद्रशेशठ कन्याशाळा, अमळनेर
शैक्षणिक गुणवत्ता कार्यक्रमात... उल्लेखनीय यश प्राप्त करणारी तालुक्यातील एकमेव शाळा...!

सहशालेय उपक्रम
CCTV ने सुरक्षित शालेय परिसर
ई-लर्निंग क्लास रुम
व्यक्तिमत्व विकास
क्रिडा मार्गदर्शन
गुणवत्तापूर्ण शिक्षण
विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

इ. ५ वी ते १० प्रवेश नोंदणी चालु आहे.

शाळेची वैशिष्ट्ये :-
* दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण.
* प्रशस्त इमारत व सर्व भौतिक सुविधा.
* आनंददायी व रचनावादी अध्ययन अध्यापन.
* विद्यार्थीनींकडे वैयक्तीक लक्ष्य देण्याच्या उद्देशाने प्रत्येक तुकडीत विद्यार्थीनी संख्या : फक्त ३० ते ४०.
* विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन.
* स्वतंत्र ग्रंथालय व सुसज्ञ प्रयोगशाळा.
* CCTV ने सुरक्षित संपूर्ण शालेय परिसर.
* सेमी इंग्रजी माध्यम.
* आधुनिक AI आधारित शिक्षण पध्दती.
* अनुभवी प्रशिक्षित शिक्षक वृंद व उज्वल यशाची परंपरा !
* ई- लर्निंगची सुविधा व सर्व सुविधा युक्त प्रशस्त इमारत.
* नियोजनबद्ध सहली.
* उत्कृष्ठ प्रकारचा शालेय पोषण आहार.
* ग्रामीण भागातील मुलींसाठी मोफत पास सवलत.
* सर्व शासकीय शिष्यवृत्त्यांचा लाभ.
* NTS, MTS, NMMS स्कॉलरशीप परीक्षांची उत्कृष्ठ तयारी.







आजच... प्रवेश निश्चित करा...!!!

* संपर्क *
मा. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी
श्रीमती द्रौपदीबाई रामचंद्रशेशठ कन्याशाळा, अमळनेर.
☎ 02587-223117 मोबा. 9420789615, 9420080302, 9579294827, 8308130906

सौ. एस. एस. सुर्यवंशी (मुख्याध्यापिका) | श्री. प्रा. पराग पी. पाटील (सचिव) | श्री. जितेंद्र मोहनलालजी जैन (चेअरमन, शाळा समिती) | श्री. निरज दिपचंदजी अग्रवाल (C.A.) (कार्याध्यक्ष, खा. शि. मंडळ)

K.E. Society's
P.B.A. English Medium School
Amalner (Dist. Jalgaon)
Estd.: 1977
Pioneer in English Medium Education in Amalner.






Admissions Open for 2026-27

शाळेची ठळक वैशिष्ट्ये
• ४९ वर्षांची गुणी परंपरा.
• नर्सरी ते इ. १० वी पर्यंत मान्यताप्राप्त वर्ग.
• कमीत कमी फी असलेली शहरातील एकमेव शाळा.
• कॉम्प्युटर लॅब्ज्, सायन्स लॅब व ग्रंथालयाची सोय.
• संगीत वाद्यवृंदाच्या सुरात प्रार्थना, दर आठवड्यात सांघिक कवायत.
• संपूर्ण शाळा सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याच्या निगराणीत.
• ई-क्लास व ई स्मार्ट क्लास इ. १ ते १० वर्गांची व्यवस्था.
• वंचित व दुर्बल घटकांसाठी इ. १ ली पासून २५% आरक्षण.
• इनडोअर गेमसाठी प्रशस्त ऑडिटोरियम हॉल व अद्यावत साहित्य.
• विविध स्पर्धा परीक्षा : जसे शासकीय चित्रकला परीक्षा, शिष्यवृत्ती परीक्षा, प्रशिक्षित शिक्षकांकडून नियोजनानुसार विद्यार्थ्यांची सर्वांगिण घडवणूक एम.टी.एस., एन.टी.एस., जी.के. ऑलिम्पियाड, नॉलेज अवर्स जिनियस ऑलिम्पियाड (गणित व शास्त्र), कल्पवृक्ष टॅलेंट सर्च, डॉ. होमी भाभा फाऊंडेशन, मुंबई (MSAT-VII to X आणि GREAT-V & VI), इन्स्पायर ॲवॉर्ड, AIMS Exam. इ. साठी मार्गदर्शन व संपूर्ण तयारी केली जाते.

Yearly Fees Chart

| Class | Fees |
|---|---|
| Nursery to Sr. K.G. | रु 12,665/- |
| Std. 1st to 5th | रु 17,045/- |
| Std. 6th to 8th | रु 20,885/- |
| Std. 9th to 10th | रु 22,975/- |

Admission Closed, Std. 1st, 9th, 10th

संपर्क क्रमांक
* श्री. जे. एस्. देवरे (मुख्याध्यापक) - ९३२५३१३२४३
श्री. बी. बी. भावसार - ८४८४८७८८२१
कुमारी एम्. एस्. बारी - ९९७५५२५५८२
श्री. एम. पी. माळी ९७३०२८६७८३ सौ. एच. आर.बोरसे ८८३०३३३३९८

श्री. जे. एस. देवरे — मुख्याध्यापक | श्री. डॉ. संदेश बी. गुजराथी — चेअरमन, स्कूल कमिटी
पी. बी. ए. इंग्लिश मिडियम स्कूल, अमळनेर
श्री. प्रा. पराग पी. पाटील — सचिव | श्री. सीए. निरज डी. अग्रवाल — चेअरमन
-खान्देश शिक्षण मंडळ, अमळनेर




डॉ. होमी भाभा फाऊंडेशन, मुंबई तर्फे 'द बेस्ट प्रिन्सिपॉल' अवॉर्ड घेतांना शाळेचे प्राचार्य श्री. जे.एस. देवरे सर
डॉ. होमी बाबा फाऊंडेशनतर्फे आयोजित 'रोबो क्वेस्ट' परीक्षेत राज्यात दुसरे व इस्त्रो श्रीहरी कोटा (भारत) भेटीसाठी निवड झाली. त्यात चि.कौस्तुभ मुकेश शिसोदे व कार्तिक मुकेश शिसोदे.
डॉ. होमी भाभा फाऊंडेशनतर्फे आयोजित MSAT परीक्षेत जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांकाचे बक्षीस स्वीकारतांना कु. भाग्यश्री प्रविण पाटील.

यशाच्या शिखरावर पोहचलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन...
सर्व सन्माननीय खान्देश शिक्षण संचालक मंडळ व
पी. बी. ए. इंग्लिश मीडियम स्कूल कर्मचारी, अमळनेर




## पी. बी. ए. इंग्लिश मीडियम स्कूलची यशोगाथा

# अमळनेरच्या विद्यार्थ्यांची देश-विदेशात उत्तुंग भरारी

शिक्षणाच्या बदलत्या प्रवाहात इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे पालकांचा वाढता कल दिसून येत असताना, अमळनेर येथील पी. बी. ए. इंग्लिश मीडियम स्कूलने आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणाऱ्या या संस्थेचे विद्यार्थी आज देश-विदेशात उच्च पदांवर कार्यरत राहून अमळनेरचे नाव उज्ज्वल करीत आहेत.

सन १९८३ मध्ये प्रसिद्ध उद्योगपती कै. श्री पुसालाल बालचंद अग्रवाल यांच्या नावाने शाळेचे नामकरण करण्यात आले. तेव्हापासून "पी. बी. ए. स्कूल" हे नाव अमळनेरमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतीक बनले आहे. आधुनिक शिक्षणपद्धती, विद्यार्थीकेंद्रित अध्यापन आणि शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन यामुळे शाळेने यशाची भक्कम परंपरा निर्माण केली आहे.

या शाळेतील विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर विज्ञान, वैद्यकीय, संरक्षण आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपली चमक दाखवली आहे. राष्ट्रीय स्तरावरील सायन्स इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शनासाठी दिल्लीतील एमआयटी




कॉलेजमध्ये स्वरांगी एकतारे हिची निवड होणे ही शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली होती. संरक्षण क्षेत्रातही शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. शिरीष सतीश देशमुख यांनी भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट कर्नल पदापर्यंत मजल मारली असून ईश्वर पाटील भारतीय नौदलात उच्च पदावर कार्यरत आहेत. मनीष शर्मा हे एअरफोर्स ऑफ इंडियामध्ये पायलट म्हणून दिल्ली येथे सेवा बजावत आहेत.

वैद्यकीय क्षेत्रातही पी. बी. ए. स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादन केले आहे. गौरी शुक्ला या आंतरराष्ट्रीय स्त्रीरोगतज्ज्ञ म्हणून लंडनमध्ये कार्यरत असून रोहित

**या मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली झाली शाळेची भरभराट**



**श्री. संदेश गुजराथी**
**चेअरमन : स्कूल कमिटी**

प्रकाश धर्माधिकारी हे आंतरराष्ट्रीय अस्थिरोगतज्ज्ञ म्हणून यशस्वी वाटचाल करीत आहेत. तसेच अमळनेर तालुक्यात अनेकांना आरोग्यसेवेची संजीवनी देणारे हृदयरोगतज्ज्ञ डॉ. निखील बहुगुणे व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रसन्न जोशी हेही याच शाळेचे माजी विद्यार्थी आहेत.

शाळेच्या या यशस्वी वाटचालीमागे संस्थेचे सर्व माजी व विद्यमान संचालक मंडळ, शिक्षकवर्ग आणि पालकांचे मोलाचे योगदान असल्याची भावना व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांच्या यशातून पी. बी. ए. इंग्लिश मीडियम स्कूलची शैक्षणिक परंपरा अधिकाधिक बळकट होत असून अमळनेरच्या शैक्षणिक क्षेत्रात ही संस्था प्रेरणादायी ठरत आहे.

# गुणवत्तेची हमी देणारे प्रताप महाविद्यालय


खान्देश शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक परंपरेचा मानबिंदू ठरलेले प्रताप महाविद्यालय (स्वायत्त), अमळनेर हे गेल्या ८१ वर्षापासून गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कारमूल्ये आणि सर्वांगीण विकासाची उज्ज्वल परंपरा जपत विद्यार्थ्यांच्या भवितव्याला नवी दिशा व गती देत आहे.

दानशूर श्रीमंत प्रतापशेठजी यांच्या दातृत्वातून आणि पूज्य साने गुरुजींच्या संस्कारमय विचारांतून उभे राहिलेले हे महाविद्यालय आज संपूर्ण महाराष्ट्रात आणि विशेषतः खानदेशात शैक्षणिक क्षेत्रातील एक विश्वासाचे प्रतिक बनले आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही बारावी उत्तीर्ण विद्यार्थी-विद्यार्थिनींमध्ये प्रताप महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी मोठी उत्सुकता दिसून येत आहे.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. हर्षवर्धन डी. जाधव यांनी विद्यार्थ्यांचे

**या मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली झाली शाळेची भरभराट**



**श्री. नीरज अग्रवाल (सी.ए.)**
**कार्याध्यक्ष : खा. शि. मंडळ**

स्वागत करताना सांगितले, की 'प्रताप महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण करून बाहेर पडलेले विद्यार्थी आज देश-विदेशात विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत. डॉक्टर, इंजिनिअर, वकील, प्रशासकीय अधिकारी, पोलिस अधिकारी, प्राध्यापक, संशोधक,

PRATAP COLLEGE, AMALNER (AUTONOMOUS

प्रताप महाविद्यालय, अमळनेर

विविध विद्याशाखेत नवीन रोजगाराभिमुख कोर्सेस सुरू

प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची उत्सुकता

आमदार, खासदार, मंत्री आणि यशस्वी उद्योजक म्हणून त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. ते जिथे कार्यरत आहेत तिथे 'आम्ही प्रतापीयन्स आहोत' याचा अभिमानाने उल्लेख करतात, हीच आमच्या संस्थेची खरी ताकद आहे.'

महाविद्यालयाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यावर दिला जाणारा भर. अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवृंद, अत्याधुनिक प्रयोगशाळा,

समृद्ध ग्रंथालय, करिअर मार्गदर्शन केंद्र, संशोधन सुविधा, भव्य क्रीडांगण तसेच सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक सर्व महाविद्यालयात उपलब्ध आहेत. आधुनिक साधनसामग्री

बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र व सुरक्षित वसतिगृह व्यवस्था करण्यात आली असून त्यांच्या देखभालीसाठी कर्मचारी वर्ग सतत तत्पर असतो. शिस्त, संस्कार आणि गुणवत्तेचा समन्वय साधणारे पर्यावरण ही प्रताप महाविद्यालयाची खास ओळख मानली जाते.

'विद्यार्थ्यांनी आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी योग्य शैक्षणिक संस्थेची निवड करणे आवश्यक आहे. प्रगतीशील भारताचा सुसंस्कृत नागरिक घडविण्याचे कार्य प्रताप महाविद्यालय सातत्याने करीत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेचे भाग व्हावे.'


शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि संशोधन क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणारे प्रताप महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना यशाचे पंख देणारे प्रेरणास्थान ठरत आहे.

**– प्रा.डॉ.एच. डी. जाधव**
प्रभारी प्राचार्य,
प्रताप महाविद्यालय,
अमळनेर.






## औषधनिर्माण शिक्षणातील विश्वासपात्र नाव.. २३ वर्षांची उज्ज्वल परंपरा
## आधुनिकतेची नवी दिशा आणि यशस्वी भविष्याची हमी



खान्देश एज्युकेशन सोसायटीचे

# स्व. श्री. पंढरीनाथ छगनशेठ भांडारकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी
# स्व. र. का. केले कॉलेज ऑफ बी. फार्मसी, अमळनेर

संतांची पावत भूमी. राष्ट्रसेवक साने गुरुजींची कर्मभूमी आणि शिक्षण, संस्कार व समाजसेवेची गौरवशाली परंपरा लाभलेले अमळनेर हे शहर उत्तर महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावरील एक मानाचे केंद्र आहे. शिक्षणमहर्षी श्रीमंत प्रतापशेटजी यांच्या दूरइष्टीतून स्थापन झतिल्या खान्देश एज्युकेशन सोसायटीने गेल्या अनेक दशकांपासून ज्ञानदानाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाचे कार्य केले आहे. हजारो विद्याथ्यांच्या जीवनाला दिशा देणाऱ्या या संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचा अनोखा संगम घडवून शैक्षणिक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे.


याच गौरवशाली परंपरेतील एक महत्त्वपूर्ण अध्याय म्हणजे खान्देश एज्युकेशन सोसायटीचे स्थ श्री पंढरीनाथ उगनशेठ भांडारकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी आणि स्व र. का. केले कॉलेज ऑफ से फार्मसी. औषधनिर्माण शिक्षणाच्या क्षेत्रात गुणवत्ता आधुनिकता. शिस्त, संशोधनाभिमुखता आणि विद्यार्थी केंद्री दृष्टिकोन यांचा उत्कृष्ट संगम घडविणारी ही संस्था आज उत्तर महाराष्ट्रातील विदयार्थ्यांसाठी विश्वासाचे आणि यशाचे केंद्र बनली आहे. जान, गुणवता आणि विश्वासाचा २३ वर्षांचा प्रवास दिनांक ११ ऑक्टोबर २००३ हा संस्थेच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरला. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन विधानसभा सभापती मा. नाम. श्री अरुणभाई गुजराथी यांच्या शुभहस्ते स्व श्री पंढरीनाथ छगनशेठ भांडारकर कॉलेज ऑफ डी फार्मसीची स्थापना झाली आणि औषधनिर्माण शिक्षणाच्या नव्या युगाची सुरुवात झाली महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ (MS-BTE), मुंबई संलग्न तसेच फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI) आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) मान्यताप्राप्त डी. फार्मसी अभ्यासक्रमाने गेल्या २३ वर्षात हजारो विद्याध्यौना यशस्वी करिअरची दिशा दिली आहे. गुणवत्तापूर्ण अध्यापन, उत्कृष्ट निकाल, अनुभवी प्राध्यापकवर्ग आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण यामुळे या महाविद्यालयाने उत्तर महाराष्ट्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे या महत्त्वाकांक्षी शैक्षणिक प्रकल्पाच्या उभारणीत स्वर्गीय श्री पंढरीनाथ छगनशेठ भांडारकर यांचे सुपुत्र श्री शरदचंद्रजी पंढरीनाथ भांडारकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्याच्या मोलाच्या सहकार्याबद्दल संस्था सदैव कृतज्ञ राहील बी. फार्मसीच्या माध्यमातून उच्च शिक्षणाची नवी दारे फार्मसी क्षेत्रातील वाढत्या संधी आणि विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाच्या अपेक्षा लक्षात घेऊन सन २०२१ मध्ये स्व. र. का. केले कॉलेज ऑफ बी. फार्मसीची स्थापना करण्यात आली. हा अभ्यासक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (DBATU), लोणेरे संलग्न असून फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया (PCI) मान्यताप्राप्त आहे. बी. फार्मसीच्या स्थापनेमुळे विद्याथ्यांना पदवी शिक्षण, संशोधन, उद्योगक्षेत्र आणि जागतिक स्तरावरील करिअरच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. स्वतंत्र आणि अत्याधुनिक शैक्षणिक संकुलाच्या निर्मितीसाठी उभारण्यात आलेल्या अध्य इमारतीचे उद्घाटन रविवार दिनांक २३ एप्रिल २०२३ रोजी श्री संत सखाराम महाराज विठ्ठल रुक्मिणी संस्थानचे गादीपती ह.भ.प. प.पू. सद्गुरु श्री प्रसाद महाराज आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण विभागाचे संचालक मा. प्रा. डॉ. विनोद एम. मोहितकार यांच्या शुभहस्ते तसेच जळगाव लोकसभा मतदारसंघाचे खासदार मा. दादासो श्री उन्मेशजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या ज्ञानमंदिराच्या उभारणीत श्रीमती रजनीताई रघुनाथ कोले यांचे बहुमोल सहकार्य लाभले. त्यांच्या मोलाच्या सहकार्याबद्दल संस्था सदैव कृतज्ञ राहील. ही इमारत केवळ वीट आणि सिमेंटची रचना नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारे, ज्ञानाला दिशा देणारे आणि यशाकडे वाटचाल घडविणारे प्रेरणास्थान आहे.



एम. फार्मसीच्या दिशेने भक्कम वाटचाल संस्थेने काळाची गरज ओळखून पदव्युत्तर शिक्षणासाठी आवश्यक सुविधा विकसित करण्यास सुरुवात केली आहे. बी. फार्मसी व एम. फार्मसी अभ्यासक्रमासाठी आवश्यक विस्तारित इमारतीचे उद्घाटन दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री मा. नाम, भाऊसो श्री गिरीशजी महाजन यांच्या शुभहस्ते आणि महाराष्ट्र राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. नाम. भाऊसो. श्री गुलाबरावजी पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. या ऐतिहासिक सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोउदयोग मंत्री मा. नाम भाऊसो. श्री संजयजी सावकारे, जळगाव लोकसभा मतदारसंघाच्या खासदार मा. ताईसो श्रीमती स्मिताताई वाघ, माजी मदत व पुनर्वसन मंत्री मा. आमदार दादासो श्री अनिलजी पाटील. धुळे येथील आमदार मा. भैय्यासो. श्री अनुपजी अग्रवाल, पारोळा मतदारसंघाचे आमदार मा. दादासो श्री अमोलजी पाटील आणि विधान परिषद सदस्य मा. भैय्यासो. श्री सत्यजितजी तांबे याची प्रमुख उपस्थिती लाभली या भव्य कार्यक्रमाने संस्थेच्या प्रगतीशील दृष्टिकोनाला आणि उच्च शिक्षणावरील रड बांधिलकीला नवी उंची प्राप्त करून दिली. आज संस्था एम. फार्मसी अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दिशेने आत्मविश्वासाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने वाटचाल करत आहे.

विद्यार्थ्यांसाठी आधुनिक आणि अत्याधुनिक सुविधा विद्याध्यांच्या सर्वांगीण विकासाला केंद्रस्थानी ठेवून महाविद्यालयात दर्जेदार आनि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत अत्याधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळा प्रशस्त, हवेशीर आणि डिजिटल अध्यापनासाठी सक्षम वर्गखोल्या शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी आर.ओ. प्रणाली स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज स्वच्छतागृहे विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र बैठक कक्ष समृद्ध संदर्भग्रंथांनी युक्त आधुनिक ग्रंथालय इटरनेट सुविधेसह सुसज्ज संगणक प्रयोगशाळा अभ्यासपूरक व संशोधनाभिमुख शैक्षणिक वातावरण अनुभवी, पात्र व विद्यार्थी हित जपणारा प्राध्यापकवर्ग करिअरच्या अमर्याद संधीकडे वाटचाल आज फार्मसी क्षेत्र हे आरोग्यसेवेतील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या क्षेत्रापैकी एक आहे. औषधनिर्माण उद्योग, संशोधन संस्था, हॉस्पिटल फार्मसी क्लिनिकल रिसर्च, फार्माकोव्हिजिलन्स. क्वालिटी कंट्रोल, रेग्युलेटरी अफेअर्स, शासकीय सेवा, अध्यापन क्षेत्र आणि उद्योजकता अशा असंख्य क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल संधी उपलब्ध आहेत. संस्था विद्याथ्यांना केवळ पदवी किंवा डिप्लोमा प्रदान करत नाही. तर त्यांच्यात आत्मविश्वास, व्यावसायिक कौशल्य, नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी आणि मानवसेवेची आवना विकसित करते. म्हणूनच येथील विद्यार्थी केवळ यशस्वी व्यावसायिक नव्हे, तर जबाबदार नागरिक म्हणूनही घडतात. पालक आणि विद्यार्थ्यांसाठी विश्वासाचे केंद्र गेल्या २३ वर्षात हजारी विद्याथ्यांनी या संस्थेतून शिक्षण घेऊन देश-विदेशातील वितिक क्षेत्रगत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांचा विश्वास, पालकांचा पाठिंबा, व्यवस्थापनाची दूरदृष्टी आणि प्राध्यापकांची निष्ठा यामुळे आज ही संस्था उत्तर महाराष्ट्रातील औषधनिर्माण शिक्षणासाठी एक विश्वासार्ह प्रतिष्ठित आणि प्रेरणादायी केंद्र महणून ओळखली जाते. या यशस्वी प्रवासामागे खान्देश शिक्षण मंडळाच्या दूरदर्शी संचालक मंडळाचे मार्गदर्शन संस्थेच्या विकासासाठी असलेली अखंड बांधिलकी, तसेच शिक्षण क्षेत्राविषयीची निस्सीम आल्या हे महत्वाचे आधारस्तंभ आहेत. बदलत्या काळाची गरज ओळखून आधुनिक शिक्षण, पायाभूत सुविधा, संशोधनाभिमुख वातावरण आणि विद्यार्थीकेंद्री उपक्रम याना सातत्याने प्राधान्य देत संचालक मंडळाने संस्थेला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेले आहे. संस्थेच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेले संचालक मंडळ, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि हितचिंतक यांच्या संयुक्त प्रयत्नामुळेच आज ही संस्था गुणवतेचे प्रतीक बनली आहे. भविष्यातही याच समर्पण, दूरदृष्टी आणि कार्यक्षम नेतृत्वाच्या बळावर संस्था औषधनिर्माण शिक्षण क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त करणे अतिशयोक्ती ठरणार नाही..

**या मान्यवरांच्या अध्यक्षतेखाली झाली शाळेची भरभराट**



**श्री. योगेश मुंदडे**
**चेअरमन**

गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा, अनुभवी मार्गदर्शन आणि उज्ज्वल करिअरची खात्री हेच आमचे वैशिष्ट्य." नवीन शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु असून फार्मसी क्षेत्रात यशस्वी, सुरक्षित आणि प्रतिष्ठित करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खान्देश एज्युकेशन सोसायटीचे स्व. श्री पंढरीनाथ छगनशेठ भाडारकर कॉलेज ऑफ डी. फार्मसी आणि स्वर का केले कॉलेज ऑफ बी फार्मसी हे निश्चितच सर्वोतम निवडीपैकी एक ठरणार आहे. "परंपरेचा अभिमान... गुणवतेची ओळख... आणि भविष्याच्या यशाची खात्री!" डॉ. किरण डी. पाटील (प्राचार्य, फार्मसी कॉलेज), प्रा. पराग पी. पाटील, (सचिव, खा. शि. मंडळ, अमळनेर), श्री. योगेश एम. मुंदडे (चेअरमन, फार्मसी कॉलेज), सी. ए. श्री. नीरज डी. अग्रवाल (चेअरमन, खा. शि. मंडळ, अमळनेर) सर्व कार्यकारी मंडळ, खान्देश शिक्षण, अमळनेर तसेच फार्मसी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी.